महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (MWRRA) कार्यालयासाठी अतिरिक्त जागा भाडयाने घेण्यास मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्र.:- मजनिप्रा-२०१८/प्र.क्र.३०/२०१८/जसं(आस्था)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २८ फेब्रुवारी, २०१८

<u>वाचा</u> : १) सचिव, मजनिप्रा, मुंबई यांचे पत्र क्र.MWRRA/Addl.Funds/२०१७-१८/५४६, दि.२६/०९/२०१७.
२) शासन पत्र क्र.मजनिप्रा-२०१७/४७७/प्र.क्र.१०६/१७/जसं(आस्था), दि.९/१०/२०१७
३) सचिव, मजनिप्रा, यांचे पत्र क्र. मजनिप्रा/२०१७/आस्था/६२९, दि.७/११/२०१७
४) सचिव, मजनिप्रा, यांचे पत्र क्र. मजनिप्रा/अ.जागा/२०१७/४५, दि.२४/०१/२०१७
५) सचिव, मजनिप्रा, यांचे पत्र क्र. मजनिप्रा/२०१७/आस्था/७३, दि.८/०२/२०१८

प्रस्तावना :

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (MWRRA), मुंबई या प्राधिकरणाची स्थापना सन २००५ मध्ये करण्यात आली असून महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे कार्यालय९ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई येथे कार्यरत आहे. दि. १ मार्च, २००६ पासून सदर जागा महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने सिकॉमसोबत लिव्ह ॲन्ड लायसेन्सवर करारनामा करुन भाडयाने घेतली होती. मजनिप्रा येथे अध्यक्ष, दोन सदस्य व त्यांना सहाय्य करण्यासाठी तांत्रिक तसेच अन्य कर्मचारीवृंदासाठी शासन निर्णय दि.५ जुलै, २०१२ अन्वये सदर जागा सिकॉमकडून महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणासाठी मालकी तत्वावर विकत घेण्यात आली आहे.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा) अधिनियम, २०१६ च्या (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८) कलम ५ मधील तरतुदीनुसार शासन अधिसूचना दि.२५/१०/२०१७ अन्वये दोन अधिक सदस्य (भूजल व्यवस्थापन) व सदस्य (विधी) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मजनिप्राकडे राज्य भूजल प्राधिकरण (State Groundwater Authority (SGA)) चे कामही सोपविण्यात आले असून राज्य भूजल प्राधिकरणाच्या कामासाठीही अतिरिक्त तांत्रिक व इतर कर्मचारीवृंदाच्या जागा भरण्यात येणार आहेत. मजनिप्रास मंजूर झालेल्या अधिकारी / कर्मचारीवृंदापैकी ४२ टक्के जागा भरण्यात आल्या असून उर्वरीत अधिकारी / कर्मचारीवृंदाची नियुक्ती भविष्यात करण्यात येणार आहे.

मजनिप्रा कार्यालयास सध्या उपलब्ध असलेली जागा अपुरी पडत असल्याने सद्य:स्थितीत वर्ल्ड ट्रेड सेंटर मध्ये ११ वा मजला येथे ६००० चौ. फूट उपलब्ध असलेली जागा भाडयाने घेण्यास मान्यता देण्याबाबत मजनिप्रा कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे. मजनिप्राने सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८, शासन निर्णय वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्रक्र.३०/विनियम भाग-२, दि.१७/४/२०१५ मधील भाग पहिला, उपविभाग एक अ.क्र.१०, नियम ११५ आणि महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम १९६५ मधील नियम १४७ (क) खालील टीप-१ समोरील अटींच्या पूर्ततेच्या अधिन राहून दि.९/१०/२०१७ च्या पत्रान्वये तत्वत: मान्यता देण्यात आली होती. तदनंतर मजनिप्रा कार्यालयाने अटींची पूर्तता करुन दि.२४/०१/२०१७ व दि.८/२/२०१८

अन्वये प्रस्तावित केल्यानुसार महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणास अतिरिक्त कार्यालयीन जागा भाडयाने घेण्यास मान्यता देण्यासाठी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

<u>शासन निर्णय :-</u>

१. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणास जागतिक व्यापार केंद्र, सेंटर-१, ११ वा मजला, कफ परेड, मुंबई ४००००५ येथील फर्निचरसह उपलब्ध असलेली २८१० चौ.फूट जागा एम.विश्वेसरैय्या इंडस्ट्रीयल रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट सेंटर, जागतिक व्यापार केंद्र, मुंबई यांचेशी झालेल्या करारानुसार दि.०१/१२/२०१७ ते दि.३०/११/२०२० (३६ महीने) या कालावधीसाठी सदर जागेकरीता भाडे रु.२१५/- प्र.चौ.फू., कॉमन आऊटगोईंग रु.१८.५६ प्र.चौ.फू. तसेच प्रॉपर्टी टॅक्स रु.१५.३२ प्र.चौ.फू. या दराने दरमहा एकूण भाडे रु.०६,९९,३८१/- (रुपये सहा लाख नव्याण्णव हजार तिनशे एक्याऐंशी फक्त) तसेच करार करताना जागतिक व्यापार केंद्रास अनामत रकमेपोटी द्यावयाचे ३ महीन्यांचे आगावू भाडे (रु.६,९९,३८१/- x ३ महीने) रु.२०,९८,१४३/- (रुपये वीस लाख अठ्ठयाण्णव हजार एकशे त्रेचाळीस फक्त) याप्रमाणे भाडेतत्वावर घेण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. या प्रयोजनासाठी होणारा खर्च मागणी क्र.I ३, २७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे, ८०, सर्वसाधारण ८००, इतर खर्च, (११) महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्प (योजनांतर्गत) (११) (१) जागतिक बँक सहाय्यित महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्प, संगणक संकेतांक क्र.२७०१ बी ०७३, ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षांतर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१८०२२८१७२०२४८०२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Rajnish Ramkishor Shukla

Digitally signed by Rajnish Ramkishor Shukla
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d37cbfb080a0bc996a710b3c0aeea737985dac09cb66bbff878f42ad4e77a606, serialNumber=293016b5f13cd03f75c9f34c66d956309c8b3cd5faf07931d817577e6116e436, cn=Rajnish Ramkishor Shukla
Date: 2018.02.28 17:21:29 +05'30'

(र. रा. शुक्ला)

अधीक्षक अभियंता व उपसचिव (जसं) महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल महोदयांचे सचिव, महाराष्ट्र राज्य,
२) मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
३) मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
४) मा. मंत्री, (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
५) मा. राज्यमंत्री, (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
६) मा.विरोधी पक्ष नेता, विधान सभा व विधान परिषद, विधानभवन, मुंबई,
७) मा.प्रधान सचिव, विधान सभा व विधान परिषद यांचे स्वीय सहायक, विधानभवन,मुंबई,
८) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
९) प्रधान सचिव (जसं) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,

१०) प्रधान सचिव, वित्त विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
११) प्रधान सचिव, नियोजन विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
१२) सचिव (लाक्षेवि) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३) सचिव (प्रकल्प समन्वय) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४) सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
१५) सचिव, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई,
१६) आंतर वित्त सल्लागार व उपसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१७) उप सचिव (सेवा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१८) उप सचिव (जसं), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१९) कक्ष अधिकारी, विनियम / व्यय-१२, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
२०) जसं(आस्था) कार्यासन, संग्रहार्थ.